ज्ञान शांति मैत्री

महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा

(संसद द्वारा पारित अधिनियम 1997, क्रमांक 3 के अंतर्गत स्थापित केंद्रीय विश्वविद्यालय)

जनसंपर्क कार्यालय

PUBLIC RELATIONS OFFICE

आज़ादी का अमृत महोत्सव

जनजातीय इतिहास को जनजातीय समाज के दृष्टिकोण से लिखने की आवश्यकता : प्रो. कुमुद शर्मा

भगवान बिरसा मुंडा जयंती एवं जनजातीय गौरव दिवस पर विशिष्ट व्याख्यान का आयोजन

वर्धा, 16 नवंबर 2026: भगवान बिरसा मुंडा की जयंती एवं जनजातीय गौरव दिवस के अवसर पर महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा में रविवार को 'भारतीय जनजातीय इतिहास का निर्माण, दृष्टिकोण, चुनौतियां और उभरते प्रतिमान' विषय पर विशिष्ट व्याख्यान का आयोजन किया गया। कार्यक्रम में मुख्य अतिथि के रूप में उत्तर बंगाल विश्वविद्यालय, दार्जिलिंग के इतिहास विभाग के एसोसिएट



प्रोफेसर डॉ. सुदाश लामा ऑनलाइन माध्यम से जुड़े। कार्यक्रम की अध्यक्षता विश्वविद्यालय की कुलपति प्रो. कुमुद शर्मा ने की। अध्यक्षीय उद्बोधन में कुलपति प्रो. कुमुद शर्मा ने कहा कि जनजातीय इतिहास का लेखन केवल बाहरी दृष्टिकोण से नहीं, बल्कि जनजातीय समाज के अपने अनुभवों, संघर्षों और दृष्टि से किया जाना चाहिए। उन्होंने कहा कि इतिहास में स्वशासन के लिए किए गए जनजातीय विद्रोहों को किस प्रकार प्रस्तुत किया गया है, इस पर गंभीरता से विचार करने की आवश्यकता है। उन्होंने नागालैंड के सोलो आदिवासी समुदाय के साथ बिताए अपने अनुभव साझा करते हुए पूर्वोत्तर भारत के असम, मेघालय और बंगाल के बोडो जनजातीय समुदायों का भी उल्लेख किया।

प्रो. शर्मा ने कहा कि प्रकृति को मानवीय संवेदना और जीवन के सूत्र में समझने के लिए हमें जनजातीय समाज से सीखने की आवश्यकता है। जनजातीय समुदाय प्रकृति के सहचर हैं और उनका जीवन प्रकृति के साथ गहरे जुड़ाव का उदाहरण प्रस्तुत करता है। उन्होंने कहा कि जनजातीय समाज को विकास की मुख्यधारा से जोड़े बिना विकसित भारत की परिकल्पना को साकार नहीं किया जा सकता। भारत में विश्व के बड़े जनजातीय समुदायों में से एक समुदाय निवास करता है, जिसके पास लौकिक ज्ञान, लोक संस्कृति और परंपरागत ज्ञान की समृद्ध विरासत है। इस ज्ञान परंपरा को समझने, संरक्षित करने और उससे सीखने की जरूरत है। उन्होंने विशेष रूप से जनजातीय समाज की पारंपरिक चिकित्सा पद्धतियों और उनके अनुभवजन्य ज्ञान को व्यापक स्तर पर समझने तथा उपयोगी बनाने पर बल दिया।

पोस्ट हिंदी विश्वविद्यालय, गांधी हिल्स, वर्धा-442001 (महाराष्ट्र), भारत

ई-मेल/E-mail: pro.mgahv@hindivishwa.ac.in **वेबसाइट/Website:** www.hindivishwa.org

दूरभाष : +91-7152-252651 मोबाइल/Mobile : 9960562305

कार्यक्रम के स्वागत वक्तव्य में छात्र कल्याण अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार ने कहा कि भारत सरकार एवं उच्च शिक्षा आयोग के निर्देशानुसार विश्वविद्यालय में समय-समय पर विभिन्न महत्वपूर्ण दिवसों और विषयों पर शैक्षणिक एवं बौद्धिक कार्यक्रम आयोजित किए जाते हैं। ऐसे आयोजन विद्यार्थियों और शोधार्थियों को भारतीय समाज, इतिहास और संस्कृति के विविध पक्षों को समझने का अवसर प्रदान करते हैं। मुख्य अतिथि डॉ. सुदाश लामा ने अपने विशिष्ट व्याख्यान में भारतीय जनजातीय इतिहास के निर्माण, उसके विभिन्न दृष्टिकोणों और इतिहास



लेखन की चुनौतियों पर विस्तार से प्रकाश डाला। उन्होंने ऐतिहासिक तथ्यों के संदर्भ में ऋग्वेद में जनजातीय समुदायों से संबंधित उल्लेख एवं श्लोक का जिक्र करते हुए जनजातीय समाज की प्राचीनता और ऐतिहासिक उपस्थिति को रेखांकित किया। उन्होंने ब्रिटिश शासनकाल के दौरान जनजातीय समुदायों की स्थिति, उनके संघर्षों और औपनिवेशिक शासन के प्रभावों पर भी चर्चा की। व्याख्यान में जनजातीय जीवन पद्धति, रीति-रिवाज, परंपराओं और सांस्कृतिक विशेषताओं को विस्तार से समझाया गया। उन्होंने कहा कि आज जनजातीय समाज अपनी पहचान, परंपराओं और अनुभवों के आधार पर स्वयं अपना इतिहास लिख रहा है। इतिहास लेखन में जनजातीय समाज की आवाज और उनके अपने दृष्टिकोण को स्थान देना समय की महत्वपूर्ण आवश्यकता है।

प्रमुख वक्ता डॉ. राकेश सिंह फकलियाल ने मुंडा जनजाति के इतिहास, सामाजिक संरचना, सांस्कृतिक परंपराओं और विशिष्ट पहचान पर प्रकाश डाला। उन्होंने मुंडा समाज की ऐतिहासिक पृष्ठभूमि एवं जनजातीय अस्मिता के महत्व को रेखांकित किया। कार्यक्रम का संचालन डॉ. किरण कुंभरे ने किया तथा धन्यवाद ज्ञापन डॉ. मीरा निचले ने प्रस्तुत किया। कार्यक्रम में विश्वविद्यालय के शिक्षक, शोधार्थी, विद्यार्थी उपस्थित रहे।

ज्ञान शांति मैत्री

महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा

(संसद द्वारा पारित अधिनियम 1997, क्रमांक 3 के अंतर्गत स्थापित केंद्रीय विश्वविद्यालय)

जनसंपर्क कार्यालय

PUBLIC RELATIONS OFFICE

आज़ादी का अमृत महोत्सव

आदिवासी इतिहासाचे लेखन आदिवासी समाजाच्या दृष्टिकोनातून होणे आवश्यक : प्रो. कुमुद शर्मा

हिंदी विश्वविद्यालयात भगवान बिरसा मुंडा जयंती, जनजातीय गौरव दिनाचे आयोजन

वर्धा, दि. 16 नोव्हेंबर 2026 : भगवान बिरसा मुंडा जयंती व जनजातीय गौरव दिनानिमित्त महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात रविवारी 'भारतीय आदिवासी इतिहासाची निर्मिती, दृष्टिकोन, आव्हाने आणि उदयोन्मुख प्रतिमाने' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उत्तर बंगाल विश्वविद्यालय, दार्जिलिंग येथील इतिहास विभागाचे असोशिएट प्रोफेसर डॉ. सुदाश लामा ऑनलाइन माध्यमातून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा होत्या. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा म्हणाल्या की, आदिवासी इतिहासाचे लेखन केवळ बाह्य दृष्टिकोनातून न होता आदिवासी समाजाचे स्वतःचे अनुभव, संघर्ष आणि दृष्टिकोन यांच्या आधारे होणे आवश्यक आहे. स्वशासनासाठी आदिवासी समाजाने केलेल्या उठावांचे इतिहासात कोणत्या प्रकारे चित्रण करण्यात आले आहे, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी नागालँडमधील सोलो आदिवासी समुदायासोबत घालवलेल्या काळातील अनुभव सांगितले. तसेच पूर्वोत्तर भारतातील आसाम, मेघालय आणि बंगालमधील बोडो आदिवासी समुदायांचाही उल्लेख केला. प्रो. शर्मा म्हणाल्या की, निसर्गाला मानवी संवेदना आणि जीवनाच्या सूत्रांशी जोडून समजून घेण्यासाठी आपण आदिवासी समाजाकडून शिकण्याची गरज आहे. आदिवासी समुदाय हे निसर्गाचे सहचर असून त्यांचे जीवन निसर्गाशी असलेल्या अतूट नात्याचे उदाहरण आहे. आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी केल्याशिवाय विकसित भारताची संकल्पना साकार होऊ शकत नाही. भारतात जगातील मोठ्या आदिवासी समुदायांपैकी एक समुदाय वास्तव्यास असून त्यांच्याकडे लौकिक ज्ञान, लोकसंस्कृती आणि पारंपरिक ज्ञानाचा समृद्ध वारसा आहे. या ज्ञानपरंपरेचे आकलन, संवर्धन आणि त्यातून शिकण्याची आवश्यकता आहे. विशेषतः आदिवासी समाजाच्या पारंपरिक औषधोपचार पद्धती आणि अनुभवाधारित ज्ञानाचा व्यापक स्तरावर अभ्यास करून त्याचा उपयुक्ततेच्या दृष्टीने विनियोग करण्यावर त्यांनी भर दिला.

कार्यक्रमाच्या स्वागतपर भाषणात विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार म्हणाले की, भारत सरकार आणि उच्च शिक्षण आयोगाच्या निर्देशानुसार विश्वविद्यालयात वेळोवेळी विविध महत्त्वपूर्ण दिवस आणि विषयांच्या अनुषंगाने शैक्षणिक व बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि संशोधकांना भारतीय समाज, इतिहास आणि संस्कृतीच्या विविध पैलूंचे आकलन करून घेण्याची संधी मिळते.

प्रमुख अतिथी डॉ. सुदाश लामा यांनी आपल्या विशेष व्याख्यानात भारतीय आदिवासी इतिहासाची निर्मिती, त्यातील विविध दृष्टिकोन आणि इतिहासलेखनासमोरील आव्हाने यांवर सविस्तर प्रकाश टाकला. ऐतिहासिक तथ्यांच्या संदर्भात ऋग्वेदातील आदिवासी समुदायांशी संबंधित उल्लेख आणि श्लोकांचा संदर्भ देत त्यांनी आदिवासी समाजाचे प्राचीनत्व आणि ऐतिहासिक अस्तित्व अधोरेखित केले. ब्रिटिश राजवटीच्या काळात आदिवासी समुदायांची स्थिती, त्यांचे संघर्ष आणि वसाहतवादी शासनाचे परिणाम यांवरही त्यांनी भाष्य केले. व्याख्यानादरम्यान आदिवासी जीवनपद्धती, रीतीरिवाज, परंपरा आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांची सविस्तर माहिती देण्यात आली. आज आदिवासी समाज स्वतःची ओळख, परंपरा आणि अनुभवांच्या आधारे स्वतःचा इतिहास लिहित आहे. इतिहासलेखनात आदिवासी समाजाचा आवाज आणि त्यांचा स्वतःचा दृष्टिकोन यांना स्थान देणे ही काळाची महत्त्वपूर्ण गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख वक्ते डॉ. राकेश सिंह फकलियाल यांनी मुंडा आदिवासी जमातीचा इतिहास, सामाजिक रचना, सांस्कृतिक परंपरा आणि स्वतंत्र ओळख यांवर प्रकाश टाकला. त्यांनी मुंडा समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि आदिवासी अस्मितेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. किरण कुंभरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. मीरा निचले यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक, शोधार्थी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोस्ट हिंदी विश्वविद्यालय, गांधी हिल्स, वर्धा-442001 (महाराष्ट्र), भारत

ई-मेल/E-mail: pro.mgahv@hindivishwa.ac.in **वेबसाइट/Website:** www.hindivishwa.org

दूरभाष : +91-7152-252651 मोबाइल/Mobile : 9960562305